पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University
सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)
✆: ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५१३००
ईमेल : dbee@sus.ac.in संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac www.sus.ac.in विस्तारीत क्रमांक : १३०
◉ परीक्षा व मूल्यमापन मंडळ ◉ Board of Examinations and Evaluation ◉

जावक क्र. : पुअहोसोवि/पवमूमं/
Ref. No. : PAHSU/BOEE/ 229

दिनांक :
Date : 20 JAN 2024

## परिपत्रक

पीएच.डी विभागाकडील जा.क्र.पुअहोसोवि/पवमूमं/७७ दि.१६/०१/२०२४ रोजीच्या परिपत्रकाअन्वये विद्यापीठ प्रशासनाने पीएच.डी. कोर्स वर्क परीक्षा आयोजित करण्यासाठी पीएच.डी. अभ्यासक्रम प्रवेश, पात्रता व परीक्षेचे (कोर्स वर्क) नियोजन इतर सर्व अभ्यासक्रमाप्रमाणे विद्यापीठाच्या सॉफ्टवेअर प्रणालीमधून (website:- www.pahsu.evidyapith.in/admin) ऑनलाईन पध्दतीने करण्याचा निर्णय घेतला आहे.

सदरची प्रक्रिया जलद व गतीमान पध्दतीने व विहित वेळेत पूर्ण होणेसाठी प्रवेशाकरिता संशोधक विद्यार्थ्यांचा प्रवेश अर्ज भरताना लागणारी सर्व माहिती विद्यार्थ्यांकडून उपलब्ध होण्यासाठी विद्यापीठ प्रशासनाने **https://pahsu.evidyapith.in/admission** ही लिंक उपलब्ध करुन दिली आहे. सदरची लिंक ही सर्व संलग्नित संशोधन केंद्र प्रमुख / संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य / विद्यापीठ संकुलामधील संशोधन केंद्र प्रमुख / संकुल यांनी वरील नमूद परिपत्रकामध्ये नमूद सर्व पीएच.डी कोर्स वर्क (w.e.f. २०२१-२२) विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी उपलब्ध करुन द्यावी. सदर लिंक बाबतची माहिती खालील प्रमाणे आहे.

१) प्रथम पीएच.डी. अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या (w.e.f. २०२१-२२) सर्व विद्यार्थ्यांना **https://pahsu.evidyapith.in/admission** ही लिंक उपलब्ध करुन द्यावी.
२) उपलब्ध लिंकद्वारे विद्यार्थी आपल्या भ्रमणध्वनीद्वारे / संगणक वरती प्रवेश अर्ज भरु शकतात.
३) सदर लिंक वर विद्यार्थ्यांनी क्लिक करावे. त्यानंतर सर्व विद्यार्थ्यांनी **New Student Admission** या पर्यायावर क्लिक करावे.
४) त्यानंतर विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्जामधील सर्व माहिती ऑनलाईन पध्दतीने भरुन Submit करावा.
५) प्रवेश अर्ज Submit केल्यानंतर सदर विद्यार्थ्यांस एक **Application Ref. No.** प्राप्त होईल.
६) विद्यार्थ्यांस प्राप्त झालेला **Application Ref. No.** व वर नमूद (जा.क्र.पुअहोसोवि/पवमूमं/७७ दि.१६/०१/२०२४) परिपत्रकातील सर्व कागदपत्रे ही सदर विद्यार्थ्यांने त्यांच्या संशोधन केंद्रामध्ये सादर करणे आवश्यक आहे.
७) विद्यार्थ्यांकडून प्राप्त झालेला **Application Ref. No.** हा सर्व संलग्नित संशोधन केंद्र प्रमुख / संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य / विद्यापीठ संकुलामधील संशोधन केंद्र प्रमुख / संकुल यांनी त्यांना उपलब्ध करुन दिलेल्या लॉगीनमध्ये Fresh Student हा पर्याय नवडून **Create New Admission using RFN No.** या पर्यायावर क्लिक करुन नमूद करावा.
८) त्यानंतर सदर विद्यार्थ्यांची ऑनलाईन प्रवेशासाठी लागणारी पूर्ण माहिती संशोधन केंद्राच्या सर्व संलग्नित संशोधन केंद्र प्रमुख / संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य / विद्यापीठ संकुलामधील संशोधन केंद्र प्रमुख / संकुल यांच्या लॉगीनमध्ये (Transfer होईल) उपलब्ध करुन मिळेल.

९) त्यानंतर सदर लॉगीनमध्ये सदर विद्यार्थ्यांसाठी

१०) उपरोक्त प्रक्रियेबाबत प्रवेश / अभ्यासक्रमाकरीता काही शंका निर्माण झाल्यास dypreexam@sus.ac.in या ईमेलवर पत्रव्यवहार व तांत्रिक बाबींसाठी pahsuexams@gmail.com या ईमेलवर पत्रव्यवहार व ८०१००८३७६० / ८०१००७६६५७ या मो.नं. वर संपर्क साधावा.

सदर, परीपत्रक सर्व संलग्नित महाविद्यालयातील मा. प्राचार्य / संचालक, विद्यापीठ संकुल यांनी संशोधन विद्यार्थी, शिक्षक, संशोधक मार्गदर्शक व प्रशासकीय कर्मचारी यांच्या सत्वर निदर्शनास आणावे व त्यानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

(डॉ. एम. एस. रोकडे)
**प्र. संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

प्रत:-

१. मा. प्राचार्य / संचालक / विभागप्रमुख, संशोधन केंद्र प्रस्तुत विद्यापीठ
२. शैक्षणिक संशोधन आणि विकास, प्रस्तुत विद्यापीठ
३. संगणक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
४. ई- विद्यापीठ, प्रस्तुत विद्यापीठ
५. पात्रता विभाग, प्रस्तुत विद्यापीठ

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ
## Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University



सोलापूर -पुणे राष्ट्रीय महामार्ग, केगांव, सोलापूर -४१३ २५५ (महाराष्ट्र)
Solapur-Pune National Highway, Kegaon, Solapur-413 255 (Maharashtra)
☏: ०२१७-२७४४७७०,७१,७२,७३,७४ फॅक्स : २३५११३००
ईमेल : dbee@sus.ac.in संकेतस्थळ - http://su.digitaluniversity.ac www.sus.ac.in विस्तारीत क्रमांक : १३०

◉ परीक्षा व मूल्यमापन मंडळ ◉ Board of Examinations and Evaluation ◉


जावक क्र. : पुअहोसोवि/पवमूमं/ 77
Ref. No. : PAHSU/BOEE/

दिनांक : 16 JAN 2024
Date :

## प्रस्तावना

विद्यापीठ स्थापनेपासून पीएच.डी. अभ्यासक्रमाचे प्रवेश, पात्रता व परीक्षा (कोर्स वर्क) अर्ज ऑफलाईन पध्दतीने घेवून प्रवेश, पात्रता व परीक्षेची (कोर्स वर्क) कार्यवाही करण्यात येत होती. परंतू अशा पध्दतीने प्रक्रिया केल्याने संबंधित सर्व घटकांचा वेळ आणि श्रम वाया जात आहे. तसेच कार्यालयीन दप्तर जतन करणे किंवा त्यावर प्रक्रिया करणे जिकीरीचे होत आहे.

सबब उपरोक्त बाबी टाळण्यासाठी विद्यापीठ प्रशासनाने पीएच.डी. कोर्स वर्क परीक्षा आयोजित करण्यासाठी पीएच.डी. अभ्यासक्रम प्रवेश, पात्रता व परीक्षेचे (कोर्स वर्क) नियोजन इतर सर्व अभ्यासक्रमाप्रमाणे विद्यापीठाच्या सॉफ्टवेअर प्रणालीमधून ऑनलाईन पध्दतीने करण्याचा निर्णय घेतला आहे.

## परिपत्रक

सर्व संलग्नित संशोधन केंद्र प्रमुख / संलग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य / विद्यापीठ संकुलामधील संशोधन केंद्र प्रमुख / संकुलामधील संचालक यांना सदर परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, ज्या विद्यार्थ्यांना खालीलप्रमाणे नमूद पीएच.डी. कोर्स वर्क अभ्यासक्रम लागू आहे त्यांच्या परीक्षेचे आयोजन करण्यासाठी सदर परिपत्रकामध्ये नमूद प्रक्रिया महाविद्यालय / संशोधन केंद्र / विद्यापीठ संकुल यांनी पूर्ण करावयाची आहे.

| Paper No. | w.e.f. 2021-22 | | Credit | UA Marks | CA Marks | Total Marks |
|---|---|---|---|---|---|---|
| I | Research Methodology | | 4 | 80 | 20 | 100 |
| II | A | Information & Computer Technology | 2 | 40 | 10 | 50 |
| | B | Research & Publication Ehics | 2 | 40 | 10 | 50 |
| III | Advanced Knowledge in Core domain of concered subject | | 6 | 100 | 50 | 150 |
| IV | Foundation and Philosophy of Research | | 6 | - | 150 | 150 |

१) सर्व संलग्नित महाविद्यालयाच्या / संशोधन केंद्र / विद्यापीठ संकुलाच्या उपलब्ध असलेल्या लॉगीनमध्ये (website:-www.pahsu.evidyapith.in/admin) संशोधक विद्यार्थ्यांच्या प्रवेशासाठी पीएच.डी. अभ्यासक्रमाचा समावेश करण्यात आलेला आहे.

२) महाविद्यालयांच्या / संशोधन केंद्र / विद्यापीठ संकुलाच्या लॉगिनमध्ये उपरोक्त तक्त्यामध्ये नमूद CA Marks Entry करण्यासाठी सुविधा उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

३) उपरोक्त अभ्यासक्रम लागू असणाऱ्या ज्या संशोधक विद्यार्थ्यांचे प्रवेश ऑफलाईन पध्दतीने झालेले आहेत अशा विद्यार्थ्यांचेच प्रवेश महाविद्यालयाने / संशोधन केंद्र / विद्यापीठ संकुलाच्या सॉफ्टवेअर प्रणालीमध्ये करावेत.

४) विद्यार्थ्यांनी ऑफलाईन पध्दतीने यापुर्वीच प्रवेश घेतले असल्याने त्यांना प्रवेश शुल्क भरण्याची आवश्यकता नाही. तसेच ज्यांची पात्रता यापुर्वीच झालेली आहे त्यांची पात्रता सॉफ्टवेअर मध्ये विद्यापीठाकडून ऑनलाईन करण्यात येईल. परंतू ज्यांची पात्रता झालेली नाही अशा विद्यार्थ्यांना Provisonal Eligible करण्यात येईल.

५) Fresh Students- ज्या विद्यार्थ्यांनी पेपर क्र.१ ते ३ ची परीक्षा आजतागायत दिलेली नाही व संशोधन केंद्राकडून पेपर क्रमांक ४ चे गुण विद्यापीठास सादर केले नाहीत अशा विद्यार्थ्यांचे प्रवेश ऑनलाईन प्रणालीमध्ये करावेत. तसेच अशा विद्यार्थ्यांची प्रवेश प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर सदर विद्यार्थ्यांचे CA चे गुण महाविद्यालय / संशोधन केंद्र / विद्यापीठ संकुल यांनी त्यांच्या लॉगिनमधून विद्यापीठास सादर करावेत.

६) Fresh Students- ज्या विद्यार्थ्यांनी उपरोक्त नमूद पेपर क्रमांक १ ते ३ ची परीक्षा देऊन उत्तीर्ण झाले आहेत परंतू संशोधन केंद्राकडून पेपर क्रमांक ४ चे गूण विद्यापीठास सादर केले नाहीत अशा विद्यार्थ्यांचे प्रवेश ऑनलाईन प्रणालीमध्ये करावेत.

७) Repeater Students- ज्या विद्यार्थ्यांनी पेपर क्र.१ ते ३ चे परीक्षा दिलेली आहे परंतू काही विषयांमध्ये अनुत्तीर्ण आहेत अशा विद्यार्थ्यांचे प्रवेश ऑनलाईन प्रणालीमध्ये करावेत. अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांचा सॉफ्टवेअर प्रणालीमध्ये प्रवेश करत असताना चारही विषयांची निवड करावी. विद्यापीठामार्फत विद्यार्थी ज्या विषयामध्ये उत्तीर्ण आहे त्या विषयांचे गुण सॉफ्टवेअर प्रणालीमध्ये विद्यापीठाकडून समाविष्ट करण्यात येणार असल्यामुळे अनुत्तीर्ण विद्यार्थ्यांचे ते ज्या विषयामध्ये अनुत्तीर्ण आहेत फक्त त्याच विषयांचे परीक्षाकरीता हॉलतिकीट जनरेट होईल.

**८) सदर प्रवेश प्रक्रिया दि.२३/०१/२०२४ पर्यंत करावी.**

९) सदर प्रवेश प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर खालील तक्त्यामध्ये नमूद कागदपत्रासहित महाविद्यालय / संशोधन केंद्र / विद्यापीठातील संकुलांनी प्रवेश अर्ज विद्यार्थ्यांच्या यादीसह (Fresh व Repeater ची स्वतंत्र यांदी द्यावी) विद्यापीठास दि.२५/०१/२०२४ पर्यंत सादर करावा.

| अ.क्र. | कागदपत्रे |
|---|---|
| १) | प्रवेश अर्ज |
| २) | प्रवेश पत्र |
| ३) | प्रवेश शुल्क जमा केलेली पावती |
| ४) | पात्रता प्रमाणपत्र<br>(ज्यांची पात्रता झालेली आहे अशांसाठी) |

१०) सदर प्रवेश प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर महाविद्यालय / संशोधन केंद्र / विद्यापीठ संकुल यांच्या लॉगिनमध्ये परीक्षा अर्ज उपलब्ध करुन दिले जातील.

११) परीक्षा अर्ज सादर करण्याबाबत व परीक्षा शुल्काबाबत स्वतंत्रतणे वेळापत्रक विभागामार्फत परिपत्रक निर्गमित करण्यात येईल.

१२) पीएच. डी. अभ्यासक्रमामध्ये सन २०२१-२२ पुर्वी प्रवेशित ज्या विद्यार्थ्यांनी पीएच. डी. कोर्स वर्कची परीक्षा दिलेली नाही किंवा अनुत्तीर्ण आहेत अशा विद्यार्थ्यांचा सॉफ्टवेअर प्रणालीमधून प्रवेशासाठीचे परिपत्रक स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येईल.

१३) पीएच.डी. कोर्स वर्क चे Paper No.I, II & IV सर्व विद्यार्थ्यांना एकसमान आहेत परंतु Paper -III हा विषय Drop down मधून निवडून महाविद्यालये / संशोधन केंद्र / विद्यापीठ संकुल यांनी प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावयाची आहे. Paper No.-III हा विषय निवडताना Drop down मध्ये एखादा विषय नसेल तर विद्यापीठाशी संपर्क साधून तो विषय समाविष्ट केल्यानंतर प्रवेश प्रक्रिया पूर्ण करावी.

१४) विद्यापीठ सॉफ्टवेअर प्रणालीमध्ये प्रवेशासाठी विद्याशाखानिहाय खालील प्रमाणे एकूण आठ अभ्यासक्रम (Fresh व Repetar साठी वेगवेगळे) उपलब्ध करण्यात आले आहे. महाविद्यालय /संशोधन केंद्र / विद्यापीठ संकुल यांनी Fresh विद्यार्थ्यांचे प्रवेश CBCS Pattern 2021 मध्ये व Repeater विद्यार्थ्यांचे प्रवेश CBCS Pattern 2021 (Repeater) मध्ये करावेत.

| Sr. No. | Program | Pattern |
|---|---|---|
| 1) | Ph. D. Course Work (Humanities) | CBCS Pattern 2021 (Repeater) |
| 2) | Ph. D. Course Work (Commerce & Management) | CBCS Pattern 2021 (Repeater) |
| 3) | Ph. D. Course Work (Sci. & Tech.) | CBCS Pattern 2021 (Repeater) |
| 4) | Ph. D. Course Work (I.D.S.) | CBCS Pattern 2021 (Repeater) |
| 5) | Ph. D. Course Work (Commerce & Management) | CBCS Pattern 2021 |
| 6) | Ph. D. Course Work (Humanities) | CBCS Pattern 2021 |
| 7) | Ph. D. Course Work (Sci. & Tech.) | CBCS Pattern 2021 |
| 8) | Ph. D. Course Work (I.D.S.) | CBCS Pattern 2021 |

१५) उपरोक्त प्रक्रियेबाबत प्रवेश / अभ्यासक्रमाकरीता काही शंका निर्माण झाल्यास dypreexam@sus.ac.in या ईमेलवर पत्रव्यवहार व तांत्रिक बाबींसाठी pahsuexams@gmail.com या ईमेलवर पत्रव्यवहार व ८०१००८३७६० / ८०१००७६६५७ या मो.नं. वर संपर्क साधावा.

सदर, परीपत्रक सर्व संलग्नित महाविद्यालयातील मा. प्राचार्य / संचालक, विद्यापीठ संकुल यांनी संशोधन विद्यार्थी, शिक्षक, संशोधक मार्गदर्शक व प्रशासकीय कर्मचारी यांच्या सत्वर निदर्शनास आणावे व त्यानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

(डॉ. एम. एस. रोकडे)
प्र. संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

प्रत:- १. मा. प्राचार्य / संचालक / विभागप्रमुख, संशोधन केंद्र प्रस्तुत विद्यापीठ
२. शैक्षणिक संशोधन आणि विकास, प्रस्तुत विद्यापीठ
३. संगणक विभाग, प्रस्तुत विद्यापीठ
४. ई- विद्यापीठ, प्रस्तुत विद्यापीठ
५. पात्रता विभाग, प्रस्तुत विद्यापीठ